9641
क्रमांकः-पोअवा/आस्था/पोउपनि/परिक्षा/ /२०१६.

कार्यालय पोलीस अधिक्षक वाशिम.

वाशिम दिनांकः- 10 NOV 2016

संदर्भः- मा.पोलीस महासंचालक,महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे ज्ञाप क्रमांक पोमस/५/१०/पोउनि-मविस्पप-२०१६/१६०/२०१६ दि.२५/१०/२०१६.

विषयः- पोलीस उपनिरीक्षक मर्यादित विभागीय स्पर्धा परिक्षा-२०१६ शारिरीक चाचणीबाबत...

-oooo-

उपरोक्त संदर्भांकीत विषयान्वये कळविण्यात येते की, आपले अधिनस्त असलेल्या जे पोलीस कर्मचारी पोलीस उपनिरीक्षक मर्यादित विभागीय स्पर्धा परिक्षा-२०१६ मध्ये अर्हताप्राप्त ठरले आहेत अशा उमेदवारांना सोबत जोडलेल्या महाराष्ट्र लोकसेवा आयोग,मुंबई यांचे पत्र क्र.१४४२(२)/मविप/२०१६/तेरा-ब/,दि.१८/१०/२०१६ ची प्रत निदर्शनास आणुन देवुन त्याबाबतचा पुर्तता अहवाल उलट टपाली या कार्यालयास न चुकता सादर करावा.

सहपत्रः-वरील प्रमाणे-१.

**( प्रशांत होळकर )**
पोलीस अधिक्षक,वाशिम

प्रति,

उपविभागीय पोलीस अधिकारी वाशिम/ मंगरुळपिर/कारंजा/ठाणेदार.,पो.स्टे.वाशिम शहर/ वाशिम ग्रामिण/ मालेगांव/ शिरपुर/रिसोड/अनसिंग/ आसेगांव /मंगरुळपीर/ जऊळका/ कारंजा शहर/ कारंजा ग्रामिण/धनज/ मानोरा/ पो.नि.जिवीशा/ स्थागुशा(मतनि/अंगुली मुद्रा/ दहशवाद विरोधी शाखा)जिल्हा वाहतुक शाखा/ शहर वाहतुक शाखा/ नियंत्रण कक्ष/कल्यान शाखा/ मोपवि/ बॉम्ब शोधक पथक/श्वान पथक/अमानी/ बिनतारी संदेश विभाग /राखीव पोलीस निरिक्षक पोलीस मुख्यालय वाशिम.

प्रत माहितीस :-

डीपीजी लिपीक पोलीस अधिक्षक कार्यालय वाशिम. /संगणक कक्ष

# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
## Maharashtra Public Service Commission

मुख्य कार्यालय : ५ वा, ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१ दूरध्वनी - २२७९५९०० फॅक्स : २२८८०५२४
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा माळा, फोर्ट, मुंबई ४००००१ दूरध्वनी :२२६७०२१०/१५८/२४८,२२१०२२२२, फॅक्स : २२६७३११५

ई-मेल – sec.mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, https://mahampsc.mahaonline.gov.in



घो. म. स. म. रा. मुंब.
0 6 2
60239/2016
18 OCT
5 1 3 9


तातडीचे

क्रमांक:-१४४२(२)/मविप/२०१६/तेरा-ब

दि.:- १८ ऑक्टोबर, २०१६

प्रति,

**अपर मुख्य सचिव,**
महाराष्ट्र शासन,
गृह विभाग, पोल ५-अ,
मंत्रालय, मुंबई – ४०००३२.

**विषय** - पोलिस उपनिरीक्षक मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा - २०१६
शारीरिक चाचणीबाबत.

महोदय,

आयोगातर्फे दि. २१ ऑगस्ट, २०१६ रोजी घेण्यात आलेल्या **"पोलीस उपनिरीक्षक मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा- २०१६"** चा निकाल लवकरच जाहीर करण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने सदर लेखी परीक्षेत अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांच्या शारिरीक चाचणीचा कार्यक्रमही तातडीने प्रसिद्ध करण्यात येणार आहे. सदर शारीरिक चाचण्या मुंबई, पुणे, औरंगाबाद व अमरावती या चार जिल्हाकेंद्रांवर घेण्याचे प्रस्तावित आहे.

२. प्रस्तुत शारीरिक चाचणीकरिता सर्व सोयींनी युक्त अशी "राज्य राखीव पोलीस दलाच्या" मैदानांची आवश्यकता आहे. त्याचप्रमाणे उपरोक्त चारही केंद्रांवर ४०० मीटर ट्रॅकसह सुस्थितितील मैदाने उपलब्ध असणेही आवश्यक आहे. सदर सर्व बाबी विचारात घेवून "राज्य राखीव पोलीस दलाची" मैदाने आवश्यक त्या सोयी सुविधांसह तयार ठेवण्याच्या सूचनाही संबंधितांना द्याव्यात अशी मी आपणांस विनंती करतो. तसेच शासनाने शारीरिक चाचणीसाठी उपलब्ध करून देणार असलेल्या मुंबई व जिल्हाकेंद्रावरील मैदानांच्या नावांची यादी संपूर्ण पत्त्यासह आयोगास त्वरित उपलब्ध करून द्यावी.

३. उमेदवारांनी शारीरिक चाचणीचा सराव करण्यासाठी संबंधित पोलीस मैदानांचा वापर करण्याविषयी विनंती केल्यास त्यांना मैदान वापरण्यास परवानगी देण्यात यावी आणि चाचणीसाठी नियुक्त केलेल्या निर्देशकास उमेदवारांना चाचणीच्या सरावासंदर्भात मार्गदर्शन करण्यास सांगावे. अशा सूचना सर्व जिल्हा पोलीस अधिक्षक, पोलीस आयुक्त व इतर संबंधित अधिका-यांना देण्यात याव्यात.

आपला विश्वासू,

( सु. सं. केसरकर )
उपसचिव (परीक्षा),
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.

**प्रत तातडीच्या आवश्यक त्या कार्यवाहीसाठी –**
**पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.**

अतितात्काळ / कालमर्यादा
क्र.पोमसं/५/१०/पोउनि-मविस्पप-२०१६/१६०/२०१६
पोलीस महासंचालक यांचे कार्यालय,
शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा,
मुंबई - ४०० ००१.
दिनांक :- २५/१०/२०१६

विषय :- पोलीस उप निरीक्षक मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा-२०१६ शारिरीक चाचणीबाबत.

* * * * *

परिपत्रक :-

महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई यांचे पत्र क्र.१४४२(२)/मविप/२०१६/तेरा-ब, दि.१८.१०.२०१६ ची प्रत पुढील आवश्यक त्या कार्यवाहीकरिता सोबत जोडली आहे.

२. सर्व घटक प्रमुखांना कळविण्यात येते की, त्यांनी सदरची बाब त्यांच्या अधिपत्याखालील पोलीस उप निरीक्षक मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा-२०१६ मध्ये अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांच्य निदर्शनास आणून द्यावी.

Rajinder Singh 25/10/16

( राजेन्द्र सिंह )
अपर पोलीस महासंचालक (आस्थापना),
पोलीस महासंचालक यांचेकरिता.

प्रति,